## संगीतबारी थिएटरांचा प्रवास ‘लोककला टू डान्सबार’ ट्रॅकवर

# थिएटरांमध्ये घुंगरांच्या छमछमऐवजी डीजेवरील ‘छम छम करता है ये नशीला बदन’चा नंगानाच राडा!

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**गण गवळणी, बतावणी अन् लावणी याचे सादरीकरण संगित बारी थिएटर्समधून व्हायचे. लावणी ही तर महाराष्ट्राची लोककला. संगितबारी थिटर्समधून या लोककलेचे संवर्धन व्हायचे. सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील सर्व संगितबारी थिएटर्सनी महाराष्ट्राची ही लाडकी लोककला जपली. मात्र काळाच्या ओघात संगितबारी थिएटर्समधील लावणी नृत्याची अभिरुची रसिकांनी राहिली नाही. डान्सबारमधील वातावरणात रमणाऱ्या आंबट शौकीनांकडून आता संगितबारी थिएटर्स यांच्याकडूनची अपेक्षा बदलली आहे.या थिएटर्समधून सादर होणारा साडीमधील नृत्यांगणांचा नृत्य कलाप्रकार त्यांना नकोय. त्यांना हवाय डीजेवर ताल धरणाऱ्या बारबालांचा अश्लील, बिभित्स नंगानाच. संगितबारी थिएटर्स मालकांनी शौकीनांची मागणी लक्षात घेऊन बदल केलाय. संगितबारी थिएटर्समधील कलाप्रकार बाजूला ठेऊन डीजे आणि बारबालांच्या धिंगाण्याला मुकसंमती दिली आहे.**

### अश्लील, बिभित्स नंगानाचाने काळवंडताहेत सोलापूरसह राज्यातील संगीतबारी थिएटर्सच्या भिंती

### डान्सबार अन् डीजेच्या दणदणाटात घुंगरांची छमछम होतेय ‘लुप्त’




संग्रहित छायाचित्र

- पांरपरिक लावणी नृत्य कलेपासून दुरावला रसिक
- खुलेआम अंगप्रदर्शन अन् नंगानाचाची नव्या पिढीला पडतेय भुरळ
- ‘माया’ कमविण्याच्या नादात थिटर्स मालकांकडून ‘मागणी तसा पुरवठा’ अर्थशास्त्रीय तत्वाची अंमलबजावणी

### लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकरांकडून पुष्टी



राज्यात डान्स बारवर बंदी आहे. त्यानंतर विविध मार्गाने डान्स बार सारखा प्रकार सर्रासपणे सुरु आहे. राज्यातील अनेक संस्कृतिक कला केंद्रामध्ये डान्स बार आणि डीजे सुरु आहे, असा दावा लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी पुण्यात केला. पुणे येथे पत्रकार परिषद घेऊन सुरखा पुणेकर यांनी यासंदर्भातील व्हिडिओसुद्धा दाखवला. या व्हिडिओमध्ये सांस्कृतिक कला केंद्रामध्ये सुरू असलेला धिंगाणा दिसत आहे.

दरम्यान डान्स बार अन् डीजेच्या दणादणाटात सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील संगितबारी थिएटर्स म्हणजेच सांस्कृती केंद्रांमधील घुंगराची छमछम आता ‘अबोल’ होत आहे. अश्लील, बिभित्स नंगानाचाने संगितबारी थिएटर्सच्या भिंती अक्षरश: काळवंडताहेत. महाराष्ट्राच्या लोककलेवर जणू घाला घातला जातोय. सांस्कृतीक कला केंद्रांना डान्सबारचे स्वरुप येत आहे. लावणीनृत्यावरील छमछम ऐकू येण्याऐवजी, आता संगितबारी थिएटर्समधून ‘कॉंटा लगा...शिवाय छम छम करता है ये नशीला बदन...’अशा गाण्यांचा धडाकेबाज डीजे वाजतोय अन् त्यावर आक्षेपार्ह नृत्यांची बिजली कडाडली जातेय. सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील ८२ पैकी ४२ कला केंद्रांमध्ये डान्स बार, डीजे सुरु आहे. त्या ठिकाणी काय, काय प्रकार सुरु आहे, त्याचे धक्कादायक याचा नंगानाच राडा सुरु झाला आहे.

विशेष म्हणजे राज्यात डान्सबारला बंदी असताना सांस्कृतिक कला केंद्रात लाईव्ह ऑर्केस्ट्राच्या नावाखाली राजरोसपणे डान्सबार चालवले जाऊ लागले आहेत. पांरपरिक लावणी नृत्य कलेपासून दुरावला रसिक खुलेआम अंगप्रदर्शन अन् नंगानामध्ये सामील होताना दिसतोय. ‘माया’ कमविण्याच्या नादात थिटर्स मालकांकडून ‘मागणी तसा पुरवठा’ अर्थशास्त्रीय तत्वाची अंमलबजावणी होतेय.

राज्यातील ८२ पैकी ४२ कला केंद्रांमध्ये डान्स बार, डीजे सुरु आहे. त्या ठिकाणी काय प्रकार सुरु आहे, त्याचे धक्कादायक व्हिडीओ चित्रण समोर आले. त्यामुळे संगितबारी थिएटरांच्या प्रवासाने ‘लोककला टू डान्सबार’ असा ट्रॅक पकडला आहे.




#### खळबळजनक आरोप

डान्स बारला राज्यात बंदी असल्याचा दावा केला जात आहे. परंतु सर्रासपणे अनेक संस्कृतिक कला केंद्रामध्ये खुलेआम डान्स बार, डीजे सुरु असल्याचा आरोप लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी केला आहे. सुरेखा पुणेकर म्हणाल्या, राज्यातील ८२ पैकी ४२ कला केंद्रांमध्ये डान्स बार, डीजे सुरु आहे. त्या ठिकाणी काय, काय प्रकार सुरु आहे, त्याचे धक्कादायक व्हिडिओ सुरेखा पुणेकर यांनी दाखवले.

#### काय आहे ‘त्या’ व्हिडिओमध्ये

राज्यात बेकायदेशीपण सुरु असलेल्या या डान्सबारवर तत्काळ बंदी आणली पाहिजे. या डान्सबारमुळे अनेक संगीतकार, कलाकार, वाजंत्री हे देशोधडीला लागले असल्याचे मत सुरेखा पुणेकर यांनी व्यक्त केले. सुरेखा पुणेकर यांनी दाखवलेल्या व्हिडिओमध्ये साडी नेसलेली महिला डान्स करताना दिसत आहे. त्या महिलेसोबत तरुण अश्लिल चाळे करताना दिसत आहे. सुरेखा पुणेकर यांनी माध्यमांना दिलेला हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### पत्नीला फुकारी अन् लाथाबुक्क्याने मारहाण

✔ **पंढरपूर :** दुसऱ्या महिलेच्या घरी बसल्याचे पाहून पत्नीने आपल्या पतीस हटकले. त्याचा राग धरून पत्नीला महिलेसह तिघांनी फुकारी आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. ही घटना तावशी (ता.पंढरपूर) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी पती, संबंधित महिला आणि तिच्या मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. राणी भारत राऊत (वय ४० रा.तावशी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना मारहाण केल्याप्रकरणी त्यांचा पती संजय राऊत, शोभा पिसे आणि तिचा मुलगा रोहन पिसे (सर्व रा.तावशी) या तिघा विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. भारत राऊत हा रविवारी सकाळच्या सुमारास शोभा पिसे हिच्या घरात बसला होता. ते पाहिल्यानंतर राणीने पतीला त्या महिलेच्या घरातच हटकले. तेव्हा दोघांनी शिवीगाळ करीत भारतने पत्नीचे हात पकडले. तर शोभा आणि तिचा मुलगा या दोघांनी मिळून त्यांना फुकारी आणि लाथाक्क्याने बेदम मारहाण केली . याची नोंद पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार साळुंखे करीत आहेत.

### शेतातील पाईप फोडून मारहाण; राजुरी येथे तिघे जखमी

✔ **करमाळा :** शेतातील ड्रीपची पाईप फोडताना रंगेहात पकडल्याच्या कारणावरून पाईप आणि दगडाने केलेल्या मारहाणीत शेतकऱ्यासह तिघेजण जखमी झाले. ही घटना राजुरी (ता.करमाळा) येथे बुधवारी सकाळच्या सुमारास घडली.



याप्रकरणी करमाळ्याच्या पोलिसांनी त्यांच्या शेतालगतच्या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे . जनार्दन मच्छिंद्र साखरे (वय ३५ ) त्यांचे भाऊ महादेव आणि वहिनी स्वाती साखरे असे तिघेजण जखमी झाले. दरम्यान जनार्दन साखरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून करमाळ्याच्या पोलिसांनी आप्पासाहेब त्याचा भाऊ गणेश देविदास मोरे, वडील देविदास आणि विजय गरड (सर्व रा.राजुरी) या चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. जनार्दन साखरे हे बुधवारी सकाळी शेतातील मोटर चालू करून वस्तीकडे निघाले होते. त्यावेळी आप्पासाहेब मोरे हा त्यांच्या शेतातील पाईप फोडतं होता. तेव्हा साखरे यांनी त्याला हटकले असता तो पळून गेला होता. त्यानंतर चौघेजण साखरे यांच्या घरासमोर येऊन त्यांना मारहाण करून जखमी केले . अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार शेख पुढील तपास करीत आहेत.

### चक्कर येऊन पडल्याने विवाहितेचा मृत्यू

✔ **सोलापूर :** चक्कर येऊन पडल्याने २१ वर्षीय विवाहित तरुणी बेशुद्ध होऊन मरण पावली. ही घटना नावदगी (ता. अक्कलकोट) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. ऐश्वर्या श्रीशैल हत्ती (वय २१रा.नावदगी ता . अक्कलकोट) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास ती घरी असताना अचानक चक्क येऊन खाली कोसळली. तिला बेशुद्ध अवस्थेत सोमनाथ पुजारी (वडील ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## ७२ वर्षीय चोरट्याकडून १४ सायकली जप्त

### शहर गुन्हे शाखेची कामगिरी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाच्या पोलिसांनी सायकल चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला अटक केली. संशयित आरोपींकडून १४ गुन्ह्यांची उकल करून गुन्ह्यात चोरी झालेला मुद्देमाल हस्तगत केला. बाबुलाल शामलाल कुकरेजा (वय-७२, रा.चिप्पा चाळ, भैया चौक) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. ही कारवाई बुधवार (दि.१९) गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील व त्यांच्या पथकाने केली.

शहरातील विविध नगरातील, सोसायटीत दिवसा व रात्री सायकल चोरी होण्याचे प्रमाण वाढले होते. नमूद गुन्ह्याचे वाढते प्रमाण लक्षात घेता वरिष्ठांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे शहर गुन्हे शाखेच्या पथकान तपास केला. यावेळी आरोपी बाबूलाल कुकरेजा याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे तपास केला असता शहरातील सायकल चोरींच्या गुन्ह्याची त्याने कबुली दिल्यावर त्याला अटक केले. अटक आरोपीकडे तपास करून १४ गुन्ह्यांची उकल करून गुन्ह्यात चोरी केलेला मुद्देमाल हस्तगत केला. वरील प्रमाणे १२ दखलपात्र गुन्हे व दोन अदखलपात्र गुन्हे असे एकूण १४ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उपायुक्त (गुन्हे) डॉ. दिपाली काळे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संदीप पाटील व पथकातील पोलीस अंमलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, उमेश पवार, बाळासाहेब काळे यांनी केली.




सोलापूर : जप्त केलेल्या सायकलींसोबत शहर गुन्हे शाखेचे अधिकारी.

## बनावट कागदपत्रे, शॉपॲक्ट लायसन तयार करून ५८ लाखांची फसवणूक

✔ **सोलापूर :** काबरा अँड कंपनी या फर्मच्या नावाचे बनावट कागदपत्र, शॉपॲक्ट लायसन तयार करून त्यावर स्वतः मालक असल्याचे दर्शवून ऑफिसमधील शिक्के व लेटरपॅडचा वापर करून ५८ लाखांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

ही घटना १६ जुलै २०२१ रोजी ते दि. ४ एप्रिल २०२४ दरम्यान फलटण गल्ली, निरगुडे कॉम्प्लेक्स, पश्चिम मंगळवार पेठ येथे घडली.

या प्रकरणी नंदकिशोर रामनिवासजी काबरा (वय-६२, रा. बुधवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. लक्ष्मण भीमाशंकर कोनाळे (रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. नंदकिशोर यांच्या वरील फर्मच्या नावाचे लक्ष्मणने बनावट कागदपत्र शॉप ॲक्ट लायसन तयार करून स्वतः मालक असल्याचे दर्शवून व ऑफिसमधील शिक्के व लेटर पॅडचा वापर केला. कर्नाटक बँकेमध्ये स्वतःच्या नावाचे चालू खाते उघडले. कामाची फी म्हणून एन. आर. काबरा अँड कंपनी या नावाने दिलेला १३ लाखांचा चेक कर्नाटक बँक मधील खात्यामध्ये जमा करून ती काढून घेऊन फसवणूक केली आहे. त्याचप्रमाणे फिर्यादींच्या खातेदारांनी इन्कम टॅक्स जीएसटी भरणा कामाकरिता संशयित आरोपींना दिलेली रक्कम भरणा न करता खातेदारांना बनावट चलन भरणा केलेली पावती दिली. एकूण ५८ लाखांची रक्कम काढून फसवणूक केली. तपास स. पो.नि. गायकवाड हे करित आहे.

## जिजाऊ रथ यात्रा मंगळवारी सोलापुरात

### माता जिजाऊ प्रेमींकडून ‘सोलापुरी’ स्वागताची जय्यत तयारी




✔ सोलापूर/प्रतिनिधी

मराठा सेवा संघ महाराष्ट्र आयोजित ’मराठा जोडो अभियान’ अंतर्गत संपूर्ण राज्यात जिजाऊ रथ यात्रेचं आयोजन केले आहे. संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या सूचनेनुसार मंगळवारी, १८ मार्च शहाजी महाराज यांच्या जयंती दिनी वेरूळ गढी येथून रथ यात्रेस मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला, मंगळवारी, २५ मार्च रोजी सायंकाळी जिजाऊ रथ यात्रेचं सोलापूर शहरात छत्रपती संभाजी महाराज चौकात भव्य स्वागत होईल, या स्वागताची जय्यत तयारी सोलापुरातील तमाम माता जिजाऊ प्रेमींकडून केली जात आहे

सोलापूर शहरातील सर्व सामाजिक, राजकीय, व्यावसायिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर स्वागतासह मिरवणुकीला उपस्थित राहणार आहेत. स्वागतानंतर अनेकविध पथकांच्या सोबत वाद्यासह रथयात्रा मिरवणुकीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात अभिवादन व पूजन करून चार हुतात्मा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन होईल. ७.०० वाजता नंतर चार हुतात्मा चौकात शाहीर पोवाडे चा कार्यक्रम व त्यानंतर त्याच ठिकाणी मार्गदर्शनपर सभेचे आयोजन केले आहे. अशी माहिती जिल्हाध्यक्ष प्रा. शिवश्री डॉ. जी. के. देशमुख यांनी दिली.४५ दिवसांच्या प्रवासानंतर पुणे येथील लाल महलात जिजाऊ रथ यात्रेची सांगता होईल. रथयात्रेसोबत संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर, मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. अर्जुनराव तनपुरे यांचेसह केंद्रीय पदाधिकारी आहेत.

#### का काढली जिजाऊ रथ यात्रा ?

सध्या समाजात एकमेकात असणारा संवाद, समन्वय, ओलावा कमी होताना दिसत आहे. यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी संभ्रम दूर व्हावा. धार्मिक, जातीय व सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, यासाठी पुरुषोत्तम खेडेकर यांनी संपूर्ण समाजाला चला पुन्हा एकदा एक होऊन सर्व शक्तिमान होऊ या, वाद मिटवून संवाद साधूया अशी एकत्र येण्याची हाक दिली आहे. म्हणून जिजाऊ शिवरायांचा एकीचा व नेकीचा संदेश घेऊन ही जिजाऊ रथ यात्रा मंगळवारी सायंकाळी सोलापुरात दाखल होत आहे. राष्ट्रमाता जिजाऊंचे दर्शन आणि जिजाऊ शिवरायांचे विचार घेण्यासाठी सोलापुरातील सर्व समाजातील बांधव व भगिनींनी बहुसंख्येने रथयात्रेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन शहराध्यक्ष शिवश्री सूर्यकांत पाटील यांनी केले.




#### हे शिलेदार घेताहेत परिश्रम

रथ यात्रेच्या नियोजनासाठी समन्वयक दत्तामामा मुळे, उपाध्यक्ष बब्रुवाहन माने-देशमुख, संभाजी ब्रिगेड अध्यक्ष सोमनाथ राऊत, उपाध्यक्ष सदाशिव पवार, सेक्रेटरी लक्ष्मण महाडिक, केंद्रीय सदस्य विश्वनाथ गायकवाड, संभाजी ब्रिगेडचे प्रकाश ननवरे, मराठा सेवा संघाचे आर. पी. पाटील, राम माने, आदी मराठा सेवा संस्थेचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

#### जिजाऊ रथाच्या आगमनाचे असे आहे वेळापत्रक

सोलापूर जिल्ह्यात रविवारी, २३ मार्च रोजी सांगोला येथे रथयात्रेचे आगमन व स्वागत होईल. मिरवणुकीनंतर पंढरपूरला मुक्काम होईल. पुढे अकलूज, टेंभुर्णीमार्गे येऊन कुर्डूवाडीला मुक्काम. मंगळवारी, २५ मार्चला कुर्डूवाडी, माढा, अनगर, मोहोळमार्गे सायं ५.३० वाजता सोलापूर शहरात छत्रपती संभाजी महाराज चौकात जिजाऊ रथ यात्रेचे भव्य स्वागत होईल.